जल जीवन मिशन हे सरकारचे अपयश;
जनतेने सरपंचाला दोष देऊ नये
>> पान 2

भाजपा दोन समाजामध्ये तेढ निर्माण करतंय;
आमदार नाना पटोले यांचा भाजपवर आरोप
>> पान 3

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ज्यांचे अस्तित्व
संपवले आहे त्यांच्या टीकेकडे काय बघायचं >> पान 4

**सुविचार**

कष्टाशिवाय यश मिळत नाही.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 255 ■ सोमवार, दि. 28 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सैराट झालं जी..! जान्हवी किल्लेकरचा सैराटमधील गाण्यावर रोमँटिक अंदाज

आतील पान

# जम्मू काश्मीरमध्ये पर्यटकांची संख्या विक्रमी वेगानं वाढणं देशाच्या शत्रुंना आवडलं नाही–पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेडिओ कार्यक्रम मन की बातच्या १२१ व्या भागात पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यावर आपलं मत व्यक्त केलं. यावेळी त्यांनी दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल, असे आश्वासन दिलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मन की बातच्या १२१ व्या भागात म्हणाले, आज मी तुमच्याशी मनापासून बोलत असताना माझ्या मनात खूप वेदना होत आहेत. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानं प्रत्येक नागरिकाला दुःख झालं आहे. शोकाकुल कुटुंबांबद्दल सर्वांच्या संवेदनशील भावना आहेत. दहशतवादी हल्ल्याचे फोटो पाहून प्रत्येक नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, पहलगाममधील हा हल्ला दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांची निराशा दाखवून देत आहे. काश्मीरमध्ये शांततेची पुनर्स्थापना होत असताना देशाच्या आणि जम्मू–काश्मीरच्या शत्रूंना ते आवडलं नाही. दहशतवादी आणि त्यांचे मालक काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करू इच्छितात. त्यामुळेच असे कट रचण्यात आले. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात देशाची एकजुट ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. या आव्हानाला तोंड देण्याकरिता आपण सामर्थ्यवान व्हायला पाहिजे.

पुढे पंतप्रधान मोदी म्हणाले, जागतिक नेत्यांनी मला फोन करून पत्रे लिहून दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला. दहशतवादाविरुद्धच्या आपल्या लढाईत संपूर्ण जग हे आपल्या १४० कोटी भारतीयांच्या पाठिशी आहे. पीडित कुटुंबांना न्याय मिळेल. या दहशतवादी हल्ल्यातील कट रचणाऱ्यांना आणि गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा मिळेल.

पाकिस्तानची कोंडी करण्यास सुरुवात– २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केल्यानंतर २६ जणांचा मृत्यू झाला. यापूर्वी २०१९ मध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या पुलवामा हल्ल्यात ४० सीआरपीएफ जवान हुतात्मा झाले होते. त्यानंतर पहलगाममध्ये सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. या हल्ल्यानंतर भारतानं वाघा अटारी सीमा बंद करणे, पाकिस्तानमधून आलेल्या नागरिकांचा व्हिसा रद्द करणे, सिंधू पाणी वाटपाचा करार स्थगित करणे यासह विविध निर्णय घेऊन पाकिस्तानची कोंडी करण्यास सुरुवात केली आहे.




## कामात हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तांचा दणका

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** शहरातील काही पोलीस ठाण्यातील तपास पथके गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यापेक्षा वसुलीवर भर देत आहेत. त्यामुळे 'गुन्हेगार मोकाट आणि पथके सुसाट' अशी स्थिती होती. पांढराबोडीतील हत्याकांड तसेच कॅफ चालकाची गोळ्या झाडून झालेली हत्या व कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'प्रॉपर्टी डीलर'चे हत्याकांड घडल्यानंतर पोलीस आयुक्तांनी अंबाझरी व कपिलनगरातील तपास पथके (डीबी) बरखास्त केली. या कारवाईमुळे अन्य पोलीस ठाण्यातील पथकांतील कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.




मागील काही दिवसांपासून नागपुरातील कायदा व सुव्यवस्थेला गुंडांकडून खुलेआम आव्हान दिले जात आहे. हत्या सत्रासोबतच गँगवॉरमधूनदेखील बऱ्याच घटना झाल्या आहेत. गोळीबार, हत्याकांड असे प्रकार वाढले होते. अनेक सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यात गुप्तचर यंत्रणा व डीबी पथके अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसून आले. गुन्हेगारांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी डीबी पथकाची मोठी भूमिका ठरते. मात्र, काही डीबी पथके हद्दीतील दारु अड्डे, जुगार अड्डे, गांजा विक्रेते आणि अवैध धंद्यावाल्यांकडून दर महिन्याला वसुली करतात. त्यामुळे गुन्हेगारांचे पोलिसांसोबत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात. अंबाझरी व कपिलनगर ठाण्यातील डीबी पथकांच्या निष्क्रियतेमुळे गुंडांची हिंमत वाढली होती. अखेर पोलीस आयुक्तांनी पुढाकार घेत या दोन्ही पोलीस ठाण्यांतील डीबी पथकांना बरखास्त केले. त्यांच्या ठिकाणी नवीन डीबी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अकार्यक्षम डीबी पथक व अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, गुन्हे शाखेची पथके आजही वसुलीवर भर देत असल्याची माहिती आहे. तसेच पोलीस उपायुक्त कार्यालयातील पथकेसुद्धा अवैध धंदेवाल्यांकडून महिन्याकाठी वसुली करीत असल्याची माहिती समोर आली आहे. डीबी पथकांवर कारवाई करण्यात येत आहे तर गुन्हे शाखा आणि उपायुक्तांच्या पथकांच्या वसुलीकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे.

## गुजरात पोलिसांची बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई: 'इतक्या' बांगलादेशी नागरिकांनी केली होती भारतात घुसखोरी

**गांधीनगर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि बांगलादेशी घुसखोरांविरोधात मोठी कारवाई सुरू केली आहे. गुजरातचे मंत्री हर्ष संघवी यांनी भारतात घुसखोरी केलेल्या बांगलादेशी रहिवाशांना दोन दिवसात आत्मसमर्पण करण्याचा इशारा दिला. त्यानंतर अहमदाबाद पोलिसांनी ८९० आणि सूरत पोलिसांनी १३४ बेकायदेशीर बांगलादेशींना पकडलं आहे. या घुसखोरांना आश्रय देणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे पकत्रडण्यात आलेल्या बांगलादेशी घुसखोरांपैकी काही जण संशयास्पद असल्याची माहिती पुढं आली. अहमदाबादमध्ये अटक केलेल्या बांगलादेशींपैकी संशयास्पद व्यक्तींची संयुक्त चौकशी केंद्रात कसून चौकशी केली जाईल, पोलीस महासंचालक विकास सहाय यांनी सांगितलं आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांच्या नेतृत्वाखाली, गुजरात पोलिसांनी राज्यातील बेकायदेशीर बांगलादेशी रहिवाशांविरुद्ध आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई सुरू केली आहे.

## छत्रपती संभाजी महाराज स्मारकाची पाहणी करुन उपाययोजना सुचविल्या

**दैनिक आपला विदर्भ**

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** कसबा येथे होणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज स्मारकाची आम्ही पाहणी केली. स्मारक अतिशय चांगले व्हावे, यासाठी काही उपाययोजना सुचवल्या आहेत.आमच्या सोबत काही बांधकाम क्षेत्रातील तज्ञ मंडळी होती. त्यांच्यासोबत आम्ही सर्वांनी मिळून इथं भव्य दिव्य स्मारक कसे उभारता येईल याची चर्चा केली. किती एकरमध्ये स्मारक होण्यापेक्षा ते स्मारक होणे गरजेचे आहे. स्मारकासंदर्भात आमच्याकडे देखील अनेक उपाययोजना सुचवल्या गेल्या आहेत.आलेल्यास उपाय योजना संदर्भात आम्ही देखील विचार करू, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, काश्मिर माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, काश्मिर येथील पहलगाव येथे भारतीयांवरती झालेला हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. अनेकांच्या घरातील करता पुरुष गेला आहे. या घरातील नागरिकांनी अनेक भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांचा आम्ही आदर करतो.यासंदर्भात आता काही न बोलता योग्य तो निर्णय आम्ही लवकरच घेऊ, अतिरेक्यांना धडा शिकवला पाहिजे, केंद्र सरकार या संदर्भात सर्वांना एकत्र घेऊन निर्णय घेत आहे. केंद्र सरकार यासंदर्भात निर्णय घेण्यास सक्षम आहे. भारतीय मिळून आपण सर्वांनी यांना साथ दिली पाहिजे. विरोधाभास बोलून आपल्या विरोधात उभे आहेत. त्यांना बळ देऊ नये,आम्ही कुठला पक्ष म्हणून तिथे गेलो नव्हतो.आमच्या या भेटीचा वेगळा अर्थ लावू नका, मी हात जोडून तुम्हाला विनंती करतो. असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्रकार परिषदेत माहिती

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही पुढे जाऊ : खा. सुनील तटकरे

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही पुढे जाऊ ही आमची राजकीय भूमिका आहे. अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वाखाली निर्णय घेतला गेला, आणि महायुतीचे सरकार आलं आहे. संघटना मजबूत व्हावी, म्हणून ही कार्यशाळा घेण्यात आली आहे. ५० टक्के महिलांना जागा आरक्षित आहेत, आणि त्यापेक्षा जास्त जागा आम्ही देऊ,पालकमंत्रीबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी निर्णय घ्यायचा आहे. सरकार आणि सरकारचे निर्णय ते घेतील.योग्य तो निर्णय ते तिघे नक्की घेतील. पहेलगाव हल्ल्याचा निषेध सगळ्यांनी केला आहे. निलेश राणे यांनी असे वक्तव्य करणे चुकीचे आहे. महापालिका निवडणुका घेण्याचा संविधानाच्या माध्यमातून प्रयत्न आहे. पुढील १, २ महिन्यात निर्णय नक्की होईल. निवडणुका न होणे म्हणजे निकोपानाच्या लोकशाहीला हे योग्य नाही. महाराष्ट्रात युतीचे सरकार आल्यावर तिन्ही पक्ष काम करत आहेत. आमच्या पक्षात सुद्धा अनेकांचा प्रवेश होतो आहे. दादांच्या नेतृत्वाला शह कोणी देण्याचा प्रयत्न करत नाही. अजित पवार विधान यावर बोलताना ते म्हणाले की, दादा स्पष्ट बोलतात. इतरांना संधी द्यायची आहे, याचा कोर ग्रुप मध्ये ठरलेलं आहे. आमची पुढची वाटचाल मोदींच्या नेतृत्वात चालली आहे. कुटुंब म्हणून मी भाष्य करणार नाही. मी राजकीय भूमिका मांडू शकतो, कौटुंबिक नातं कौटुंबिक असते. मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही पुढे जाऊ ही आमची राजकीय भूमिका आहे. जयंत पाटील येणार कोणी सांगितलं? ९० पासून ते प्रबळपणे काम करतात. त्यांच्या मनातील फारसे कोणाला कधी कळले नाही. विधिमंडळात आमची सहज भेट झाली होती. दीर्घकाळ आमचा राजकीय प्रवास सोबत झाल्यामुळे मैत्री आहे. एकदा दोनदा चर्चा झाली, पण ती चर्चा वेगळी कुठली नाही झाली. पोटातले पाणी हलू न देणे, ही जयंत पाटील यांची खासियत आहे. त्यांच्या चेहऱ्यावर काही वाचता येणार नाही, हे मात्र नक्की आहे. शेवटी ते एका राजकीय पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ते नेहमीच ॲक्टिव्ह असतात. राज्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. तीव्र उन्हामुळे पाण्याचा साठा कमी झाला आहे. ही वस्तुस्थिती आहे. दुष्काळी भागातील काही नदया जोडल्या गेल्या तर चित्र नक्की बदलेल. राज्य सरकारचा हा प्रथम क्रमांकाचा प्रश्न आहे.अशी माहिती यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



## लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कुणीच म्हटलं नाही

### मंत्री नरहरी झिरवाळ यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजनाबाबत सर्व लाडक्या बहिणी खुश आहेत. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, असं कोणीही म्हटलेलं नाही, अगोदर विरोधकांनी हे पंधराशे रुपये देखील देणार नाहीत यांची देण्याची ऐपत नाही, असा प्रचार सुरू केला होता. मात्र १५०० दिल्यानंतर विरोधकांनी आता २१०० रुपयावर जास्त जोर धरला आहे. मला वाटतं १५०० ही रक्कम देखील परिपूर्ण आहे. महिला १५०० मिळाल्यानंतरही खुश आहेत. अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी मंत्री झिरवळ म्हणाले की,मंत्रिमंडळात नवीन लोकांना संधी देणे, हे अजित दादांचे चांगले धोरण आहे.नितेश राणे वक्तव्य व्यवहार करताना हिंदू आहे का विचारावा, काय बोलावं हा ज्याचा त्याचा विषय आहे. त्यामुळे त्यावर ते काय म्हणाले त्यावर मी भाष्य करणे योग्य नाही. बावनकुळे वक्तव्य २०३४ पर्यंत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री राहतील. यावर बोलताना ते म्हणाले की, ही जनता जनार्दन आहे. चांगलं काम करत राहिल्यास निश्चितच जनता आशीर्वाद देईल. आणखी किती वर्ष त्यांनी मुख्यमंत्री राहावे हे जनता ठरवेल. अजित पवार नंबर दोनचा इशारा यासंदर्भात मी ऐकले नाही, मात्र चर्चा आहे. माजी मंत्री अनिल पाटील, माजी मंत्री छगन भुजबळ यांची देखील मंत्रिमंडळात वर्णी लागावी अशी आमची विनंती आहे. माझे भाग्य आहे की, आज मला आदिशक्ती मुक्ताईचे दर्शन घ्यायची संधी मिळाली. महाराष्ट्राला समृद्ध करण्यासाठी ज्यांचा समावेश आहे. त्यांच्या माती, मंगल कलश रथ यात्रेचे माध्यमातून उत्तर महाराष्ट्राची मुक्ताईनगर येथून सुरवात झाली आहे. संपूर्ण राज्यभर हा कार्यक्रम राबविला जात आहे. सर्व राज्यातील माती, जल महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती स्थळी अर्पण केले जाणार आहे. अशी माहिती मंत्री नरहरी झिरवळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.



## सामान्यांना दिलासा....

अमेरिकेने छेडलेले व्यापारयुद्ध, जागतिक भांडवली बाजारांची घसरगुंडी, रशिया युक्रेन संघर्ष आणि मध्य-पूर्वेतील अशांततेमुळे जगभरात महागाईने कळस गाठलेला. शेजारी पाकिस्तानात तर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडलेल्या. अशात भारताने गेल्या पाच वर्षांत नोंदवलेला नीचांकी महागाई दर म्हणजे अर्थझळीतील सुखावणारी झुळूकच ! देशातील किरकोळ महागाई दर फेब्रुवारीतील ३.६१ टक्क्यांवरून मार्चमध्ये ३.३४ टक्क्यांवर आला, हा मोठा दिलासा. ऑगस्ट २०१९ सालानंतरचा हा सर्वांत कमी वार्षिक महागाई दर सामान्यांना दिलासा देणारी महागाईत झालेली ही घट प्रामुख्याने अन्नधान्याच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे आहे. ग्राहक अन्न मूल्य निर्देशांकानुसार मोजली जाणारी अन्नधान्य महागाई फेब्रुवारीतील ३.७५ टक्क्यांवरून मार्चमध्ये २.६९ टक्क्यांवर आली. रिझर्व्ह बँकेने महागाई नियंत्रणात ठेवण्याचे उद्दिष्ट चार टक्के इतके निर्धारित केले आहे. त्यामुळे मध्यवर्ती बँकेसाठी ही दिलासादायक बाब ठरेल. यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरले. अन्नधान्याच्या किमतींमध्ये लक्षणीय घट झाल्यानेच महागाई नियंत्रणात आली. ग्राहक किंमत निर्देशांकाचा महत्त्वाचा भाग असलेल्या अन्नधान्यांची महागाई कमी होण्यासाठीही अनेक घटक कारणीभूत ठरले. कृषी उत्पादनात झालेली सुधारणा, समाधानकारक पर्जन्यमानामुळे उत्पादनात झालेली वाढ दर नियंत्रणात राखणारी ठरली. सरकारने किमती स्थिर राखण्यासाठी केलेला हस्तक्षेपही महत्त्वाचा ठरला. अनुकूल हवामानाची जोड त्याला मिळाली. म्हणूनच लक्षणीय वाढ रोखली गेली. भाजीपाल्याचे दर कमी झाल्याने अन्नधान्याच्या महागाईत घट झाली, असे म्हणता येते. त्याचवेळी जागतिक पातळीवरही वस्तूंच्या किमती कमी झाल्या आणि कच्च्या तेलाच्या किमती तुलनेने कमी राहिल्यामुळे देशांतर्गत इंधनाच्या किमती नियंत्रणात राहिल्या. जागतिक भूराजकीय अनिश्चितता, अस्थिरता असताना, भारतात नियंत्रणात आलेली महागाई ही म्हणूनच अत्यंतिक महत्त्वपूर्ण अशीच. मध्यवर्ती बँकेने चलनवाढीचा दबाव कमी होण्यासाठी ज्या उपाययोजना राबवल्या, त्याही महत्त्वाच्या अशाच. महागाई नियंत्रणात राहिल्याने आता रिझर्व्ह बँक चलनविषयक धोरणात अधिक लवचिकता आणू शकेल. मध्यवर्ती बँक आता आर्थिक वाढीला पाठिंबा देण्यावर अधिक लक्ष केंद्रित करू शकते. यामुळे गुंतवणूक आणि वापराला चालना मिळेल. त्यामुळे जीडीपी वाढीचा दर वाढेल. कमी चलनवाढ ग्राहकांना थेट फायदा देते, त्यांची क्रयशक्ती वाढवते आणि ग्राहकांच्या खरेदीची भावना वाढवते. ग्राहकांचा हा सकारात्मक विश्वास आर्थिक क्रियाकलापांना चालना देणारा ठरेल आणि एकूणच तो आर्थिक वाढीस हातभार लावेल. महागाई कमी झाल्याने, गुंतवणूकदारांचाही विश्वास वाढीस लागेल. त्यामुळे देशांतर्गत तसेच विदेशी गुंतवणूक आकर्षित होईल. आर्थिक स्थिरतेमुळे गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. त्यामुळे भांडवलाचा प्रवाह वाढतो आणि आर्थिक विस्तार होतो, असे ढोबळमानाने मानले जाते. रिझर्व्ह बँकेने मार्च महिन्यातील महागाई दर लक्षात घेऊन, रेपो दरात केलेली कपात आर्थिक वाढीला चालना देणारी आहे. भारतात सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमानाचा अंदाज स्कायमेट तसेच हवामान विभागाने नुकताच वर्तवला आहे. त्यामुळे यंदा सलग दुसऱ्या वर्षी भारतात चांगले पर्जन्यमान असेल. त्यामुळे स्वाभाविकपणे कृषी उत्पादनात वाढ होईल आणि अन्नधान्याच्या किमती स्थिर राहतील, असे मानले जाते. जागतिक स्तरावरील अनिश्चितता पाहता, रिझर्व्ह बँकेने आपल्या धोरणात्मक दृष्टिकोनात लवचिकता ठेवली आहे. त्यामुळे या संकटाचा प्रभावीपणे सामना करता येईल. अन्नधान्याच्या किमतीतील घट, चांगला मान्सून आणि मध्यवर्ती बँकेच्या धोरणात्मक उपाययोजनांमुळे महागाई दर नियंत्रणात राहिला आहे. तथापि, जागतिक घटकांचा प्रभाव आणि कोर महागाई दर लक्षात घेता, आगामी काळात मध्यवर्ती बँकेला काळजीपूर्वक धोरणे आखावी लागतील, हे नक्की. त्याचवेळी, रेपो दरात केलेली कपात कर्ज स्वस्त करणारी ठरली असून, आर्थिक वाढीस चालना देणारी आहे. कमी महागाई दर हे आर्थिक स्थैर्याचे, वित्तीय शिस्तीचे आणि अनुकूल धोरणांचे प्रतीक आहे. अशा परिस्थितीत ग्राहकांचा विश्वास वाढतो, परिणामी खर्च वाढतो आणि गुंतवणुकीस प्रोत्साहनही मिळते. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्धाने जगाची चिंता वाढवली आहे. अमेरिकी धोरणांमुळे भारताला अप्रत्यक्षरित्या फायदा होणार असला, तरी जगभरातील अर्थव्यवस्था त्यामुळे अनिश्चित झाल्या आहेत. महामारीनंतर अशीच परिस्थिती भारताने अनुभवली होती. जगभरात आर्थिक मंदीचे सावट तीव्र झाले असताना, भारताची वाढ मात्र विक्रमी दराने होत राहिली. आघाडीच्या अर्थव्यवस्था मंदीकडे वाटचाल करत असताना, भारतीय अर्थव्यवस्था जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली. आताही २०३० सालापर्यंत भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था झालेली असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वर्तवला आहे. त्यावेळीही जागतिक पातळीवर अस्थिरता कायम होती. रशिया-युक्रेन युद्धाने आर्थिक मंदीचे संकट तीव्र केले. आजही हे युद्ध थांबलेले नाही. दरम्यानच्या काळात 'इस्रायल-हमास' रक्तरंजित संघर्षाने मध्य-पूर्वेला अशांत केले. असे असतानाही, भारताची वाढ होत राहिली. हे कमी की काय म्हणून आता अमेरिका-चीन व्यापारयुद्धाला तोंड फुटले आहे. अमेरिकी मध्यवर्ती बँकेने महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी आक्रमक पद्धतीने दरवाढ करण्याचे धोरण अवलंबले, तर भारतीय मध्यवर्ती बँकेने दरवाढ न करता, धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अमेरिकेतील दरवाढीने तेथील बँकांचे कंबरडे मोडले, ग्राहकांची क्रयशक्ती कमी झाली, मागणी अभावी मंदी आली. भारतात दर नियंत्रणात राहिल्याने, सामान्यांना फारसा फटका बसला नाही. आता तर रिझर्व्ह बँकेने रेपो दरात केलेली कपात, ग्राहकांच्या खर्चाला चालना देणारी ठरली आहे. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक या दोघांनीही धोरणांची केलेली प्रभावी अंमलबजावणीच देशातील आर्थिक वाढ कायम ठेवणारी ठरली आहे. इंधनाचे आटोक्यात राहिलेले दर महागाईला नियंत्रणात ठेवणारे ठरले आहेत. असे असतानाही, विरोधक मात्र सातत्याने नसलेल्या महागाईवरून सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न करतात. २०२२ सालापासून देशात इंधनाचे दर वाढलेले नाहीत. किंबहुना, ते स्थिर आहेत. जगात सर्वत्र ऊर्जा महाग झाली असताना, भारतात ती स्थिर आणि परवडेल अशा दरात आहे. मात्र, विरोधकांच्या म्हणण्यानुसार, इंधनाचे दर महाग आहेत. सामान्यांची दिशाभूल करण्याचे काम हे विरोधक आणि त्यांच्या मासिक पगारावर असलेली माध्यमे इमानेइतबारे करतात. प्रत्यक्षात भारतीय अर्थव्यवस्था जागतिक दिग्गज संस्थांचे अंदाज मोडीत काढत विकासाचे नवनवीन विक्रम रचत आहेत. आता महागाईही नियंत्रणात आल्याने, सरकारला आपली विकासाभिमुख धोरणे नव्याने आखण्याची संधी मिळेल, रिझर्व्ह बँक पतधोरण आखताना काही ठोस उपाय राबवू शकेल, असे आज नक्कीच म्हणता येते.

# जल जीवन मिशन हे सरकारचे अपयश; जनतेने सरपंचाला दोष देऊ नये

## मुंबई सरपंच परिषदेचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**मनोज गोरे**

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये तब्बल २ वर्षांपासून जल जीवन मिशनअंतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे सुरु आहे. मात्र एकही योजना अजूनपर्यंत पूर्णत्वास आलेली नाही. गावागावांतील काँक्रिट रस्ते फोडून ठेवले आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील नागरिक प्रभावित झाले असून सरकारच्या नाकर्तेपणाचा रोष सरपंचांना ओढवून घ्यावा लागत आहे. जल जीवन मिशन हे सरकारचे अपयश असून जनतेने सरपंचाला दोष न देण्याचे आवाहन सरपंच परिषद मुंबईचे चंद्रपूर जिल्हा समन्वयक आशिष देरकर यांनी गाव खेड्यातील नागरिकांना केले आहे.

कंत्राटदरांकडून सुरू असलेल्या कामावर प्रशासनाचा वचक नाही. कंत्राटदरांकडून कामात हयगय होत असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या. मात्र शासनाकडे पैसा नसल्याने कंत्रादारांची बिले अदा न झाल्याचे कारण सांगून कंत्राटदारांची पाठराखण करण्यात येते. ही बाब गंभीर असून गाव खेड्यातील नागरिकांना वाऱ्यावर सोडले आहे. अनेक ठिकाणी अंदाजपत्रकानुसार काम होताना दिसत नाही. पाइपलाइन टाकण्याकरिता रस्ते फोडून ठेवण्यात आले असून, दुरुस्तीच्या कामात मात्र प्रचंड दुर्लक्ष केले जात आहे. अनेक ठिकाणी रस्त्यातील सळाख बाहेर निघून नागरिक जखमी होत आहे. ह्याचा रोष नागरिक ग्रामपंचायतीवर काढतात. काम करणाऱ्या कंत्राटदारांवर सरकारचाच कोणताही वचक राहिलेला नाही. त्यामुळे सरपंचाचे कोण ऐकणार? अशी अवस्था आहे. कंत्राटदारांची बिले थकीत असल्याने ते कामे अर्धवट सोडून देत आहेत. यामुळे गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहे.

कोट्यवधींच्या योजना जाहीर करूनही जर सरकारकडे पैसेच नाहीत, तर ही योजना काढली कशासाठी? हा प्रश्न आहे.

प्रत्येक सरपंचाला आपल्या गावात शुद्ध पाणी पोहोचावे, रस्ते पूर्ववत व्हावेत अशी खरीखुरी भावना असते. मात्र थेट केंद्र व राज्य सरकारच्या अखत्यारितील या योजनेमध्ये, लाखो रुपयांचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदारांशी सामान्य सरपंच लढा देऊ शकत नाही. तरीदेखील अनेक सरपंच आपल्या परीने लढा देत आहेत. शासन स्तरावर निविदा प्रक्रिया झाल्याने ग्रामपंचायतींचा या योजनेशी थेट संबंध नाही.

जल जीवन मिशन योजनेमुळे ज्या गावांचे रस्ते, दैनंदिन जीवन व्यवस्थित होते, ती गावे सध्या अस्वच्छतेच्या, धुळीच्या विळख्यात सापडली आहेत.

या गंभीर बाबीकडे सरकारने तात्काळ लक्ष द्यावे व गावातील जनतेने या सगळ्याबाबत आपल्या सरपंचांप्रती सहानुभूती ठेवावी, असे आवाहन सरपंच परिषद मुंबईचे जिल्हा समन्वयक, आशिष देरकर यांनी केले असून लवकरच जल जीवन मिशन योजनेच्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन उभारण्याची दिशा ठरवण्यात येणार असल्याचे सांगितले.

## पाकिस्तानने भारताला दिली अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी

इस्लामाबाद : पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढण्यास सुरवात झाली आहे. पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी दिली आहे. व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी भारताला सिंधू नदीचे पाणी थांबवल्यास युद्धासाठी तयार राहण्याचा इशारा देताना दिसत आहेत. पाकिस्तानचे पाणी थांबवले तर भारताने युद्धासाठी तयार व्हावे. घौरी, शाहीन, गझनवी ही क्षेपणास्त्र फक्त प्रदर्शनासाठी नाहीत. भारताला उत्तर देण्यासाठीच ठेवली आहेत. आम्ही १३० अण्वस्त्रे प्रदर्शनात मांडण्यासाठी ठेवलेली नाहीत. ती पाकिस्तानात कुठे आहेत हे तुम्ही पाहू शकत नाही. पण हवी तेव्हांआम्ही ती वापरू; या शब्दात पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी दिली आहे.

## सैराट झालं जी..! जान्हवी किल्लेकरचा सैराटमधील गाण्यावर रोमँटिक अंदाज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** अभिनेत्री जान्हवी किल्लेकरने नुकतंच सोशल मीडियावर एक खास रील शेअर केलं आहे, ज्यामध्ये ती सुपरहिट मराठी चित्रपट सैराटमधील सैराट झालं जी या लोकप्रिय गाण्यावर रोमँटिक अंदाजात नृत्य करताना दिसते आहे. जान्हवीच्या या रीलला चाहत्यांकडून भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. तिच्या नाजूक अदा आणि मोहक नृत्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.


रीलमध्ये जान्हवीने साधा पण आकर्षक पेहराव केला असून, तिच्या हसऱ्या चेहऱ्यावरची सहजता चाहत्यांना विशेष भावली आहे. सैराट झालं जी या गाण्याच्या पार्श्वभूमीवर तिने केलेला डान्स सोशल मीडियावर सध्या चांगलेच चर्चेत आहेत. अनेकांनी तिच्या या रीलवर लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. जान्हवीने याआधीही आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने रसिकांचे मन जिंकले आहे. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दलही चाहते उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

जान्हवीने तिच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात २०१३ साली रुंजी या स्टार प्रवाहवरील मालिकेतून केली. त्यानंतर तिने श्री गुरुदेव दत्त (२०१९) या मालिकेत लक्ष्मी मातेची भूमिका साकारली.भाग्य दिले तू मला या कलर्स मराठीवरील मालिकेत सानिया या खलनायिकेच्या भूमिकेतून तिला विशेष ओळख मिळाली. याशिवाय, राधा प्रेम रंगी रंगली, फुलपाखरू आणि दिल दोस्ती दुनियादारी या मालिकांमध्येही तिने काम केले आहे .

जान्हवीने बिग बॉस मराठी ५ या रिॲलिटी शोमध्ये सहभाग घेतला होता. या शोमध्ये तिच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि वादग्रस्त वक्तव्यांमुळे ती चर्चेत आली होती. जान्हवी सोशल मीडियावर सक्रिय असून, तिच्या अभिनय, नृत्य आणि वैयक्तिक आयुष्यातील क्षणांचे अपडेट्स ती नियमितपणे शेअर करते. तिच्या इंस्टाग्रामवर सुमारे ६ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत.

## मनाविरुद्ध लग्न केल्याच्या रागात वडिलांनी आपली मुलगी आणि जावयावर केला गोळीबार, गोळीबारात मुलीचा मृत्यू






दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा शहरातील आंबेडकर नगरात काल हळदीचा कार्यक्रम सुरु होता, या हळदीच्या कार्यक्रमांमध्ये सी.आर. पी.एफ मधून सेवा निवृत्त झालेल्या पी.एस.आय. ची मुलगी तृप्ती हिने आपल्या विरुद्ध लग्न केल्याने, त्याचा राग मनात ठेवून होता. उच्चशिक्षित मुलगी तृप्ती हिने कमी शिक्षण घेतलेल्या मुलासोबत लग्न केल्याने हा राग मनात होता. जावई अविनाश वाघ याची बहिणीचं लग्न चोपडा येथे आंबेडकर नगरात हळदीचा कार्यक्रम सुरू असताना, त्या ठिकाणी मुलगी व जावई आले असल्यास बेत साधून हळदीचा कार्यक्रमात नाच गाण सुरू असताना, किरण मंगळे यांनी आपल्याजवळ असलेल्या परवानाधारक पिस्तूलने मुलीवर आणि जावईवर गोळीबार केला. त्यात मुलगी तृप्ती जागेवर मयत झाली, तर जावई अविनाश वाघ याच्या कमरेला व हाताला गोळी लागली असल्याने त्याला पुणे येथे पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले.



मुलगी व जावई

गोळीबार करणारा किरण मंगळे याला उपस्थित नागरिकांनी चांगला चोप दिल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. त्याला जळगाव येथे उपचारासाठी रवाना केल आहे. अविनाश वाघ यांची आईच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस स्टेशनला आरोपी किरण मंगळे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे करीत आहे.

## सोशल मीडिया इनफ्लूएन्सरला चुकीचा स्पर्श, जाग्यावर तरुणाच्या कानाखाली आवाज काढला!


नवी दिल्ली : एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेल्या मुलीला चुकीच्या पद्धतीने स्पर्श करण्यात आल्याचा प्रकार समोर आलाय. दरम्यान, चुकीच्या पद्धतीने स्पर्श करताच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेल्या मुलीने त्या मुलीच्या कानशिलात लगावली आहे. प्रसंग घडताच त्या मुलीने कोणतीही भीती न बाळगता संबंधित मुलाला कानशिलात लगावली. तिच्या या ठाम आणि धाडसी प्रतिसादाचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. दरम्यान, ही रील स्टार व्हिडीओ शूट करत असताना मुलगा तिथे आला आणि त्याने तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केलाय. यानंतर लगेच तिने प्रत्युत्तर दिलंय. या घटनेचा व्हिडीओ संबंधित रील स्टारने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन शेअर केलाय.

## गोंदिया जिल्ह्यात मक्याला पाच हजार रुपये क्विंटल दर मिळावा

### शेतकरी व मजुरांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्हा हा धानाचे कोठार म्हणून ओळखला जातो. मात्र, सततच्या तोट्यामुळे पर्यायी पीक म्हणून यंदा अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी तालुक्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मक्याची लागवड केली आहे. सध्या मका पीक कापणीच्या अंतिम टप्प्यात असून, शेतकरी व मजुरांमध्ये मका पिका भविष्याबाबत उत्सुकता आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, धानाच्या तुलनेत मक्याला चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मक्याला किमान ५००० रुपये प्रति क्विंटल दर मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दुसरीकडे, कापणीच्या कामामुळे मजुरांनाही रोजगार उपलब्ध झाला असून १६० रुपये रोजंदारीवर मजूर काम करत आहेत. दर मिळाल्यास केवळ शेतकऱ्यांचेच नव्हे, तर मजुरांच्याही रोजीरोटीचा प्रश्न सुटेल, असे मत मजुरांनी व्यक्त केले. शेतकरी व मजूर यांना योग्य भाव व रोजगार मिळावा, यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.





DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# भाजपा दोन समाजामध्ये तेढ निर्माण करतंय

## आमदार नाना पटोले यांचा भाजपवर आरोप

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे मंत्री निलेश राणे यांनी रत्नागिरीच्या सभेमध्ये ज्याप्रमाणे पहलगाममध्ये धर्म विचारला गेला, त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सुद्धा आपण दुकानदारकडे जाऊन त्यांच्या धर्म विचारावा आणि त्यांना हनुमान चालीसा पठण करायला लावावी,असे वक्तव्य केले होते. त्याच्या समाचार घेत असताना काँग्रेसचे माजी प्रदेश अध्यक्ष नाना पटोले म्हणाले यांनी भाजपाने आपल्या वाचाळवीरांना पहावं. एका बाजुला नरेंद्र मोदी एक है तो सेफ आहे. असे नारे देतात. असे वक्तव्य करून धर्माधर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम भाजपा करीत आहेत.असा आरोप नाना पटोले यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे.

यावेळी ते म्हणाले की, भाजपच्या वक्तव्याचे परिणाम आज देश भोगत आहेत. ज्याप्रमाणे काश्मिरमध्ये अनेक मुस्लिम बांधवांनी पर्यटकांना वाचवले त्याने सहकार्य केले. एवढेच नाही तर, देशभरामध्ये मुस्लिम समाजाने पाकिस्तान मुर्दाबादचे नारे दिले. ज्याप्रमाणे भाजपाचे खासदार, मंत्री वागत आहेत. हे चुकीचे असल्याचे नाना पटोले म्हणाले. उलट राहुल गांधी यांनी जम्मू-काश्मिरमध्ये जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. मात्र, पंतप्रधान यांनी याकडे दुर्लक्ष करीत मात्र बिहारच्या निवडणुकीकडे आपले लक्ष केंद्रित करण्यात करीत असल्याचा टोला यावेळी नाना पटोले यांनी लगावला.

उलट इंदिरा गांधींनी अशा प्रकारच्या हल्ला जेव्हा भारतावर झाला त्यावेळेस लाहोरमध्ये जाऊन पाकिस्तानची विभागणी केली. परंतु, हा आपल्या देशावर हमला आहे आणि या हमल्या विरुद्ध काँग्रेस ही सरकारच्या सोबत असल्याची भूमिका नाना पटोले यांनी मांडली. एका बाजुला संजय राऊत हे गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनामा मागत आहेत. तर शरद पवार यांनी दहशतवादी विरोधी धोरण ठरवावे, असे वक्तव्य केले. यावरून गृहमंत्री शहा यांच्या राजीनामाच्या विरुद्ध महाविकास आघाडीमध्ये मतभेद आहेत का यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की,ज्याप्रमाणे देशाची माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि असे अनेक नेते आहेत. ज्यांच्या कार्य काळामध्ये अशा घटना झाल्या. अशा नेत्यांनी स्वतःहून राजीनामा दिला आहे. त्यामुळे जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगावी अशी भूमिका काँग्रेसची आहे. पण ज्यांना सत्ताच पाहिजे गेंड्याच्या कातडीची सरकार असलेले लोक आहेत. झालेल्या घटनेची चूक लक्षात घेऊन याबाबतीत त्यांनी निर्णय घ्यावा.



मात्र, ज्याप्रकारे देशावर हल्ला झाला आहे. त्याला उत्तर देणे फार गरजेचे आहे. जेणेकरून पुढे देशावर असं कोणत्याही प्रकारचा हमला होणार नाही, अशी भूमिका काँग्रेसची आहे. धर्म विचारुन मारलं का याबाबतचं सत्य माहित नाही असं पवार म्हणाले. आधीच्या घटनांमध्ये धर्मावरुन चर्चा नव्हती आता चर्चा का असा सवालही त्यांनी केला. तर पवारांनी मृतांच्या आप्तेष्टांकडून घटना ऐकावी असा सल्ला फडणवीसांनी दिलाय यावर बोलताना पटोले म्हणाले की,त्यांच्या आत्ता परिवारांना विचारण्यापेक्षा ही घटना झालीच कशी त्याच्या खरा दोषी कोण.. याच्यावर आत्मपरीक्षण करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ आहे. असा टोला नाना पटोले यांनी लगावला. भाजपाने जो विभाजन वाद निर्माण केला त्याची फळ आम्हाला भोगावे लागत आहे. अशी जनमानसाची भावना आहे. यामध्ये आम्हाला पळायचे नाही,अशी भूमिका काँग्रेसची आहे. मात्र, या घटनेच्या जशास तसे उत्तर द्यावे असे मत नाना पटोले यांनी व्यक्त केले.

## आमची युती जनतेशी असेल : बच्चू कडू

**मुंबई/ प्रतिनिधी :** जाती,धर्म आणि भाषा या सगळ्या वादाच्या विरोधात माझा कार्यकर्ता सामान्य माणसाच्या हक्कासाठी संताजी, धनाजी सारखा लढावा यासाठी हा पुरस्कार आहे. हे राजकीयच नाही तर लढणारे संघटन आहे. याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आमची युती ही जनतेशी असेल असे मत बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते पुढे म्हणाले की,आताच्या ज्या योजना आहेत. त्या सर्व योजना यातून सरकार पण चालेल, आणि पक्ष पण चालेल अशा आहेत. तुम्ही बजेट पण पहा, प्रत्यक्षात लूट चालू आहे. भाजपचा, सर्व बिल्डरचे पैसे बरोबर निघतात, पण दिव्यांगांचे पैसे, रोजगाराचे पैसे थांबतात.आज पश्चाताप पेक्षा दिलासा वाटतो, दिव्यांग मंत्रालयामुळे माझ्या मतदारसंघातले लोक म्हणत होते जाऊ नको, पण शिंदे आणि फडणवीस यांनी सांगितलं दिव्यांग मंत्रालय भेटेल, बदनामी झाली जाऊ द्या, पण दिव्यांग मंत्रालय भेटलं. येत्या काळात आघाडी की युती? असा प्रश्न केला असता आमची युती जनतेशी असेल, असे मत बच्चू कडू यांनी व्यक्त केले.



### एका विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या स्कूल बस चालकाला नवी मुंबई पोलिसांनी केली अटक

दैनिक आपला विदर्भ



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शाळेच्या बस चालकाने चार वर्षीय विद्यार्थी मुलासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. याबाबत विद्यार्थ्याच्या पालकांनी एनआरआय पोलीस ठाण्यात धाव घेतली व घडलेला प्रकार सांगितला. यानंतर पोलिसांनी अधिक तपास केला तर आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक देखील करण्यात आली आहे. ३० एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, अधिक तपास नवी मुंबई पोलीस करत आहेत.

## हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना २५ लाख रुपयांची मदत करावी

### शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/ प्रतिनिधी :** हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना २५ लाख रुपयांची मदत करावी, शहीदांचा दर्जा द्यावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केली.

तुम्ही श्रीनगरहून थेट गोव्याला गेलात, गोव्याहून कुडाळला गेलात. रात्री साडे दहापर्यंत जल्लोष करून फटाके फोडून ढोल वाजवित होते. तुमच्यातील संवेदना मृत पावली होती का ?,तुम्हाला असे वाटले नाही की, शहिदांना भेटून आलोय. विदारक दृश्य पाहिले. एकीकडे तिकडे जाऊन नक्राश्रू ढाळायचे इकडे येऊन कुडाळला आनंद साजरा करायचा, हे रुप एकनाथ शिंदे यांचे आहे.सव्वा पाच हजार पाकिस्तानी नागरिकांपैकी १०७ नागरिक बेपत्ता आहेत. हे १०७ नागरिक अतिरेकी होण्यासाठी गेले आहेत का ? याचा शोध महाराष्ट्र सरकारने घेण्याची आवश्यकता आहे. यावर शासनाने लक्ष दिले असते तर, ही घटना घडली नसती. तर या आधी शेकडो नागरिक आले असते.



२६११ किंवा पेहलगाव सारखी घटना घडण्यास जितके अतिरेकी जबाबदार आहेत. तितकीच केंद्र सरकारची आणि राज्य सरकारची गुप्तचर यंत्रणा जबाबदार आहे. हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना शहिदांचा दर्जा द्या, शहीदांला उपलब्ध असलेला सर्व मान सन्मान द्यावा, काश्मीर सरकारने १५ लाख रुपये दिले. त्यांच्या घरातील प्रत्येक करत्याला सरकारी नोकरी द्यावी, २५ लाख रुपयांची मदत करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी केली आहे.

## मनोज जरांगे यांची छगन भुजबळांवर सडकून टीका

दैनिक आपला विदर्भ

**जालना/ प्रतिनिधी :** छगन भुजबळ हा कामातून गेलेला माणूस असून, तो पिसाळलेल्या कुत्र्यासारखा आहे. त्याला काय बोलावं ते सूचत नाही, असं म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी छगन भुजबळांवर जहरी टीका केली आहे. सरकारने किती नोंदी शोधल्या किती जणांना प्रमाणपत्र दिले हे आम्हाला चांगलं माहित आहे. तो आता कामातून गेलेला माणूस आहे. त्यामुळं असे वक्तव्य करून त्याला जाती जातीत भांडणं लावायची आहे. गरीब ओबीसीलाच तो कुठच आरक्षण खावू देत नाही. त्यामुळे त्याला आता महत्व देत नाही. कुणाचा बाप कुठंही गेला तरी ते आता रद्द होत नाही. तु आता कोर्टात जा मग तुला मराठ्याचा कचका कळेल. तु जर कोर्टात गेला तर, संपूर्ण ओबीसी आरक्षणाला चॅलेंज करेल असा इशाराही जरांगे यांनी भुजबळांना दिला आहे. त्याचबरोबर येत्या ३० तारखेला सरकारचे तीन महिने पूर्ण होत आहेत. उदय सामंत आणि संदिपान भुमरे यांच्याशी मी फोनवर चर्चा केली. मात्र अद्याप त्यांना मुख्यमंत्र्यांनी वेळ दिली नाही, असं त्यांनी सांगितल आहे. मात्र येत्या ३० तारखेला पत्रकार परिषद घेऊन, मराठा आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करेल. पुन्हा रस्त्यावर तुम्हाला मराठा दिसेल, असा इशाराही जरांगे यांनी राज्य सरकारला दिला आहे.



## हिंदू विरुद्ध मुसलमान कुणी करत असेल तर ताबडतोब थांबवला पाहिजे - छगन भुजबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** काश्मिर येथील पहेलगाव येथे झालेला हल्ल्याबाबत कुणी हिंदू विरुद्ध मुसलमान असा वाद करीत असेल तर, तो ताबडतोब थांबविला पाहिजे,असे मत आमदार छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की,पहेलगाव प्रकरणी भारत सरकार योग्य ती कारवाई करत आहे. सर्वांचा त्याला पाठिंबा आहे. धर्मात वाद होता कामा नये, अनेक मुस्लिम बांधवांनी काश्मिर येथे मदत केली आहे. काश्मिर येथील नागरिकांनी निषेध केला आहे. लढायचं असेल तर, आपण सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे, सैनिकांना बळ मिळेलं, एकी आणि देशाचे उतपादन कसे वाढेल ? आपल्या जवळ दहशतवादी आहे का? याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यांचा उद्देश आहे. आणि दंगे भडकविण्याचा उद्देश आहे. कश्मिरचा विकास कसा थांबेल हा उद्देश आहे. जे झाल ते फार वाईट झाले. मी तात्काळ त्यावर बोललो होतो. भारत सरकार आपले काम करत आहे. सिंधू करार त्यावर निर्णय झाला आहे. विरोधकांनी पण त्यावर एकमत केले आहे.



आपण आपले काम करणे गरजेचे आहे.आपण आपापसात काही वाद घालू नये, तेथे पण घोडेवाल्यांनी त्यावर विरोध केला. ज्या प्रमाणे २६/११ वेळी पोलिस तुकाराम ओंबळे यांनी जीव दिला तसेच इथे ही झाले. जम्मू काश्मिरचे मुख्यमंत्री यांनी पण घटनेचा निषेध केला. या परिस्थितीत काही ठिकाणी हिंदू-मुस्लिम करत असेल तर ते थांबले पाहिजे. काही करायचे तर आपण सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे, लगेच ते त्यावर काही बोलतील आणि काही करतील असं नाही, त्यावर मोदी सरकार पाऊल उचलतील. धर्म विचारून मारले ते असेल पण तिथले काही मुस्लिम होते. भारतात दंगे पेटून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जम्मू काश्मिर येथील व्यापार आणि काही विकास थांबला पाहिजे हा उद्देश आहे.

आपण त्याला बळी पडता कामा नये, मुस्लिम धर्म गुरूंनी त्यांच्या विरोधात निषेध केला आहे. शरद पवार यांनी सर्व बघितले आहे. त्यावर वाद नको,भारत सरकारने कठोर पावले उचलली आहेत.पाणी बंद केले त्यावर त्यांची फार मोठी अडचण होणार आहे. ही मोठी बाब आहे. आपण आर्मीवर विश्वास ठेवला पाहिजे,लगेच आपल्याला वाटले तर निर्णय होईल असे नाही. सर्व तयारीत असणार त्यावर परिणाम होईल. तर, पिक विम्याचा लोकांनी गैरफायदा घेतला, एनए प्लॉट वर पिक दाखवले. काही चुकीच्या गोष्टींमुळे योजना अडचणीत येत आहे. नाशिक पाणी टंचाईनिर्माण होत आहे. जास्त प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे पाणीटंचाईची समस्या मोठी आहे. येवल्याला देखील अनेक गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. लोकांनी पाण्याचा अपवय करू नये, सर्वांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन आमदार छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना केले आहे.

## संक्षिप्त...

### बॉम्बस्फोटाची खोटी माहिती देणाऱ्या आरोपीला अटक



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** वैयक्तिक दुश्मनी काढण्याच्या इराद्याने मशिदीमध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याचे फोन एका माथेफिरूने पोलिस नियंत्रण कक्षाला केला. त्यामुळे पोलिसांची चांगलीच धांदल उडाली. चौकशीअंती खोटी माहिती दिल्याचे निष्पन्न झाले आणि पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला. याप्रकरणी आरोपीवर बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी तांत्रिक तपास करून पोलिसांनी दीपक शाहूबा ढोके (रा. एन ११, टीव्ही सेंटर हमू शुभम पॅलेस चैतन्य नगर धनकवडी, पुणे) या आरोपीला अटक केली आहे.

### कल्याणच्या एपीएमसी मार्केटमध्ये कैचीने भोसकून हत्या ; धक्कादायक प्रकाराने भितीचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/ प्रतिनिधी :** कल्याणच्या एपीएमसी मार्केट मध्ये भरदिवसा २० वर्षीय तरुणाने पती, पत्नीसह त्यांच्या मुलावर कैचीने हल्ला करून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.सदर घटनेत गंभीर जखमी झालेल्या पतीचा मृत्यू तर, मुलगा गंभीर जखमी झाला आहे. पत्नीला किरकोळ दुखापत झाली आहे. चमनलाल कारला असे मयत वडिलांचे नाव, तर मुलगा कार्तिक गंभीर जखमी असून कल्याणच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदर घटनेप्रकरणी चिराग सोनी या हल्लेखोर तरुणाला बाजार पेठ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चमनलाल कारला आणि चिराग सोनी हे दोघे एपीएमसी मार्केटमध्ये बाजू बाजुला केळीची पाने विक्री करण्याचा व्यवसाय होता. आज विक्रीसाठी आलेले केळीच्या पानांचे बंडल अदलाबदली झाल्याने चमनलाल आणि चिरागमध्ये झाला.याच वादातून चिरागने कैचीने हल्ला केल्याने एकाचा मृत्यू झाला. तर दोन जण जखमी झाले आहेत. सदर प्रकरणी पोलीसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती कल्याण एसपी घेटे यांनी दिली आहे.एसीपी कल्याणजी घेटे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

### ठाकरे गटाचे आंदोलन म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा ; आमदार संजय केनेकर यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** ठाकरे गटाचे आंदोलन म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा आहेत.अशी टिका माध्यमांशी बोलताना आमदार संजय केनेकर यांनी ठाकरे गटावंर केली. यावेळी ते म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी दोन वेळेस नारळ फोडले. तेव्हा मी उद्धव ठाकरेंना जवाब विचारायला गेलो होतो, तेव्हा मला अटक केली होती. खैरे मोठमोठ्यांनी सांगत होते, समांतर जलवाहिनी मिळाली. तुम्ही आणली तर, मग पाणी कुठे गायब झालं ते पण सांगा. देवेंद्र फडणवीसांनी पैसे दिले, तेव्हा हे काम सुरळीत चालू आहे. लोकांना तुम्ही मूर्ख बनवले, त्यामुळे लबाड तुम्ही आहात. रात्रीतून खैरणे किती जणांना पैसे वाटले. ठेकेदारांना पवळणारे हेच आहेत आणि उचलून आणणारे पण हेच आहेत. यांच्या घरात पाणी आलं, पण लोकांच्या घरात पाणी आलं नाही, लोकांच्या डोळ्यात पाणी आलं आहे.छत्रपती संभाजीनगर करांना पाणी मिळत नाही, हे सत्य आहे. पण पाण्यासाठी सगळ्यात जास्त श्रम लागलेले आहेत ते भाजपचे.अतुलची साबळे यांनी खऱ्या अर्थाने या समर्पित होऊन काम केल, आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पैसे आणले. आम्ही लवकरात लवकर ५ दिवसात पाणी देण्याचं काम करतो आहे. पाईपलाईनचे काम चालू आहे, त्यामुळे उशीर लागतोय. सोमवारी माझी धडक कंपनी आणि आयुक्तावर जाण्याची कारवाई चालू झाली आहे. मी धडक कारवाई करणार आहे, आणि कंपनी वाल्यांना विचारणार आहे. तुम्ही पाणी देणार आहे का रस्त्यावर येताय. लोकांच्या प्रश्नासाठी मी रस्त्यावर यायला तयार आहे. असेही संजय केणेकर म्हणाले.

## विविध वृत्त...

### पाकिस्तानला दयामया दाखवण्याची गरज नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलडाणा/प्रतिनिधी :** पाकिस्तानी नागरिकांना सांगितले आहे की, तात्काळ देश आणि महाराष्ट्र सोडावा, असं फरमान आपण सरकारने काढलं आहे. पाकिस्तानला दयामया दाखवण्याची गरज नाही.असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, जे आश्रय देतील त्यांना देखील सोडलं जाणार नाही, राज्यात लपून बसलेल्या पाकिस्तान्यांना पोलीस शोधतील आणि तिथेच ठोकतील. संजय गायकवाड यांनी पोलिसांसंदर्भात केलेल्या वक्तव्य संदर्भात मी देखील दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यांच्या काही पोलिसांच्या बाबतीत तक्रारी असतील तर, त्या मुख्यमंत्री आणि माझ्याकडे सांगाव्यात, निश्चित कारवाई केली जाईल. परंतु, काही पोलिसांमुळे अख्या पोलीस दलाला दोषी पकडता येणार नाही. आम्ही वर्दीचा सन्मान करणारी लोक आहोत.असे मत यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### ही सरकारवर नामुसकी ओढवणारी बाब : जयश्री शेळके

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलडाणा/प्रतिनिधी :** वादग्रस्त वक्तव्य करून दिलगिरी व्यक्त करणं, ही सरकारसाठी नामुसकी ओढवणारी गोष्ट आहे. असे मत शिवसेना ठाकरे गटाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी आमदार संजय गायकवाड यांच्या दिलगिरीवर टिका करताना व्यक्त केले. यावेळी त्या म्हणाल्या की, वादग्रस्त वक्तव्य करून दिलगिरी व्यक्त करणं ही सरकारसाठी नामुसकी ओढवणारी गोष्ट आहे. सरकार मधले आमदार बोलतायेत ते योग्य आहे की, पोलिस प्रशासन योग्य आहे. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात भूमिका स्पष्ट केली पाहिजे, आमदार संजय गायकवाड यांनी पोलिसांच्या बाबतीत केलेल्या विधानानंतर दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यावर ठाकरेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी आपली प्रतिक्रिया देताना ही बाब सरकारवर नामुसकी ओढवणारी असल्याचे मत व्यक्त केले आहे.

### बापाच्या पुण्याईवर राजकारण करणं व रेगोट्या ओढण इतकं सोपं नसतं ; शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांची रोहिणी खडसेंवर टिका



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** रोहिणी खडसे यांच्या बुद्धीची क्यू करावीशी वाटते, रोहिणी ताई आपला अनुभव किती? आवाका किती? आणि तुम्ही बोलताय कितीय़, बापाच्या पुण्याईवर तुम्ही राजकारणात तग धरून आहात.अशी टिका शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी रोहिणी खडसेंवर केली.

एकनाथ खडसे यांनी जाहीरपणे सांगितलं होतं की, एकनाथ शिंदे यांनी विमान पाठवलं नसतं तर, माझं विमान कधीच स्वर्गात उडालं असतं. रोहिणी ताई एकनाथ शिंदे यांनी पाठवलेलं विमान किंवा एअर ॲम्बुलन्स एकनाथ खडसे यांचा प्राण वाचवतो, आपल्या वडिलांचे प्राण वाचवणाऱ्या एकनाथ शिंदेंबद्दल बोलणे आपल्या संस्कारात बसत का? बापाच्या पुण्याईवर राजकारण करणं व रेगोट्या ओढणं इतकं सोपं नसतं.एकनाथ शिंदे यांनी स्वतःची खर्च करून चार विमान पाठवली. रोहिणी ताई तुमचा अभ्यास कमी पडतो, थोडा अभ्यास करून बोलत जा,असा टोलाही त्यांनी लगावला.

जे कोणी कधीही विमानात बसले नाही त्यांना आम्ही विमानात आणलं तर तुम्हाला मुंग्या का लागलेत?, तुमच्या पक्षप्रमुखांनी साधी संवेदना सुद्धा व्यक्त केली नाही. तुमचे पक्षप्रमुख विदेशात जाऊन काय थंड हवेत बर्फाचा गोळा खात आहेत. का? त्याला आम्ही बेशरमपणा म्हणायचं का? निर्लज्जपणा म्हणायचा? याचं उत्तर तुम्ही आम्हाला द्या, असा प्रश्न यावेळी शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी उपिस्थत करीत रोहीणी खडसेंवर टिका केली.

# एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ज्यांचे अस्तित्व संपवले आहे त्यांच्या टीकेकडे काय बघायचं

## उदय सामंत यांची उबाठा शिवसेनेवर टिका

**दैनिक आपला विदर्भ**



**नागपूरबु/प्रतिनिधी :** शिंदे बॅनर वर ठाकरे गटाची टीका यावर बोलताना सामंत म्हणाले की,ज्या लोकांचं अस्तित्व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने संपवले आहे. त्यांच्या टीकेकडे काय बघायचं? अशी टिका मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना ठाकरे गटावर केली. वळसे पाटील यांच्याकडून घेतो. ते ऊर्जा मंत्री विधानसभा अध्यक्ष राहिलेत, राज्याचे गृहमंत्री राहिलेत. त्यामुळे त्यांच्या मनात काय? ते माहिती करून घेतो आणि माझ्याकडे काय माहिती ती त्यांना देतो. कॅबिनेट सब कमिटीमध्ये एखादा मेगा प्रोजेक्ट जातो, तेव्हा त्याला ३ रुपयांपर्यंत सबसिडी देतो हे जगजाहीर आहे. त्यांच्या मनात काही शंका असेल तर मी स्वतः भेटून त्याला दूर करेन. वैभव नाईक माझे कॉलेज पासूनचे मित्र आहेत. माझ्या कॉलेजच्या मित्रांनी चांगल्या लोकांसोबत काम करावे असं मी म्हटलं आहे. शेवटी शिंदे हे मुख्य नेते आहेत. ते सांगतील ते आमच्या पक्षात होत असतं. राणे यांच्या सल्ल्याने जे करायचे ते करू, नरहरी झिरवळ लाडक्या बहिणीविषयी काय बोलले याबद्दल मला माहित नाही. मात्र, याबद्दल मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. जो निवडणुकीचा अजेंडा तयार करतो त्याला पाच वर्ष अवधी असतो. त्यावर योग्य वेळी निर्णय घेतील. संजय गायकवाड यांनी पोलिसांबद्दल असे वक्तव्य करण अयोग्य आहे. दुसरं त्यांनी जाणीव झाल्यावर माफी देखील मागितली. असे वक्तव्य होऊ नये आमच्या सर्वांची भूमिका आहे. मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलिसांनी आपलं नाव जगभरात लौकिक केले आहे. वैयक्तिक गोष्टीसाठी संजय गायकवाड बोलले असतील. परंतु, त्यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाची पाहणी करण्यासाठी अजित पवार आले होते. मी पालकमंत्री म्हणून होतो. तर, ते आमच्या जिल्ह्यातील आमदार म्हणून संभाजी महाराजांच्या स्मारकाची आखणी कशी आहे. हे बघण्यासाठी आले होते. त्यामागे राजकीय उद्देश कोणता नव्हता. शिंदे बॅनर वर ठाकरे गटाची टीका यावर बोलताना सामंत म्हणाले की,ज्या लोकांचं अस्तित्व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने संपवले आहे. त्यांच्या टीकेकडे काय बघायचं? एकनाथ शिंदे हे गावी शेती करायला गेले तरी त्यांच्यावर टीका होते. जम्मू कश्मीरला महाराष्ट्रातील लोकांच्या मदतीला गेले तरी टीका होते. परंतु, ही सगळी मंडळी लंडनला गेली तरीही आम्ही टीका करत नाही, हे आमच्या मनाचा मोठेपणा आहे. असे मत मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल

## पोलिसांबद्दल आक्षेपार्ह व्यक्तव्य करणे भोवले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पोलिसांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध बुलढाणा शहर पोलिसात विविध कलमान्वये २६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी पोलिसांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने पोलीस प्रशासन व राजकीय गोटात एकच




खळबळ उडाली आहे. सदर प्रकरणाची दखल घेत पोलीस प्रशासनाने आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध बुलढाणा शहर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

विशेष म्हणजे २७ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बुलढाणा येथे कार्यकर्ता आभार मेळाव्यासाठी येत असतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेच्या पूर्व संधेलाच शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आक्षेपार्ह वक्तव्य करून राजकीय गटात खळबळ उडून दिली आहे.त्यामुळे आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्हासीयांचे लक्ष लागले असून सदर प्रकरणात कोणते वळण घेते व आमदार गायकवाड यांच्याविरुद्ध काय कारवाई होते.की, केवळ गुन्हा दाखल प्रक्रियेने प्रकरण निपटल्या जाते याकडे जिल्हा वर्षाचे लक्ष लागले आहे.

पोलीसांच्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल आमदार संजय गायकवाड यांची माफी. माझं वक्तव्य संपूर्ण महाराष्ट्रातील पोलिसांचे धैर्य खचवणं, अपमान करण्याचं नव्हतं,त्या बद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन केला होता, त्यांच्याशी बोलणं झालं आहे. अशी माहिती शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना देत पोलीसांबद्दलच्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

### बुलढाण्यातील चिखली रोडवर असलेल्या ऑइल शॉपला भीषण आग

**बुलडाणा/प्रतिनिधी :** चिखली मार्गावरील सरकार विद्या मंदिर समोर असलेल्या ऑइल शॉपला आज सायंकाळी भीषण आग लागली. क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण केले होते. दुकानातून उंच



काळे धुराचे लोट उठू लागले आणि भयाण वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा नगर पालिकेचे मुख्यधिकारी गणेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्रचंड आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्नाला यश आले आहे. आगीमुळे शेजारील दुकानांना देखील धोका निर्माण झाला होता. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

## रिसोड येथे एकच नारा, जलतारा कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थी रॅलीचे आयोजन

**रिसोड/प्रतिनिधी :** शासनाने सुरू केलेल्या जलतारा या अभियानाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने रिसोड येथे एकच नारा जलतारा या कार्यक्रमाला अंतर्गत विद्यार्थी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.





प्रत्येकाने पावसाचे पाणी ''जलतारा'' पध्दतीने जमिनीमध्ये साठवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे गरजेचे झाले आहे तसेच या जलतारा अभियानामध्ये सर्वांनी सहभाग नोंदवून त्याची अंमलबजावणी करणे जनहितार्थ ठरेल असे मत छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त गजानन मुलंगे यांनी व्यक्त केले.

यावेळी टि.डी.कुलमेथे नायब तहसिलदार ,अरुण मगर, गजानन कोरडे पोलीस पाटील रिसोड हे उपस्थित होते उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थी रॅलीला हिरवी झेंडी दाखविल्या नंतर रॅली पाणी आडवा,पाणी जिरवा, जल है तो कल है,एकच नारा, जलतारा अश्या विविध घोषणा देत अष्टभुजा देवी चौक,भगवान महावीर मार्ग,कुंभार गल्ली मार्गे परत विद्यालया मध्ये पोहोचली.

# नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान ठरलं पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू

## बच्चे कंपनीसाठी उंट, घोडे, रेल्वे गाडी, साहसी खेळ आकर्षण

**दैनिक आपला विदर्भ**





**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातील एकमेव राष्ट्रीय उद्यान नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान. आजूबाजूला पर्वताच्या रांगा, मधेच सुंदर तलाव, संपूर्ण निसर्गरम्य वर्णन, आजूबाजूला पक्षांची किलबिल आणि चिमुकल्यांसाठी आनंद देण्यासाठी विविध प्राणी आणि आगगाडी, त्यातही साहशी खेळण्यासाठी अनेक साधनं उपलब्ध, असा पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलाय नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान. जिल्हा सोबतच इतर जिल्ह्यातील नागरिकांना पर्यटनाचे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे.

गोंदिया शहरापासून पासून ७० किलोमीटर दूर अंतरावर असलेला नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान लगतच गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा जिल्हा त्यामुळेच या परिसरातील नागरिकांना एक आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. अनेक नागरिक दर दिवशी फिरण्यासाठी आणि आपल्या लहान चिमुकल्या मुलांना आनंद देण्यासाठी या राष्ट्रीय उद्यानाला भेट देत असतात. दररोज १००० च्या वर पर्यटक या ठिकाणी येत असून, सुट्टीच्या दिवशी मात्र मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याचे दिसून येते. या ठिकाणी उंट, घोडा, रेल्वे गाडी, बोटिंगची व्यवस्था येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करून जातात.

या ठिकाणी मुलांच्या साठी साहसी खेळांचे साहित्य या ठिकाणी पर्यटकांच्या सोबत मुलांना आकर्षणाच्या केंद्रबिंदू ठरले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये या ठिकाणी नागरिक येत असतात आणि या ठिकाणी महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागात द्वारा रिसॉर्ट, सार्वजनिक बांधकाम विभागाचा रेस्ट हाऊस, आणि थांबण्यासाठी अनेक साधन या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेत. त्यामुळे नागरिकांना एक आनंदाची पर्वणी नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान ठरत आहे. एवढेच नाही तर खवय्यांसाठी ग्रीन पार्क रेस्टॉरंट सुद्धा आकर्षणाचे केंद्र या ठिकाणी ठरत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे आणि परिसरातील स्थानिक नागरिकांना रोजगार मिळाला आहे.